(५)

क्र.साप्रवि/रवका/सा.आ./न.क्र.४९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. २६ दिनांक १४/३/२००६

विषय : म.रा.वी.वितरण कंपनीच्या कर्मचा-यांनी त्यांच्या वैयक्तिक कामाकरिता राजकीय पक्षाकडून किंवा ति-हाईत व्यक्तीकडून दबाव आणणेबाबत.

संदर्भ : १) परिपत्रक क्र.साप्रवि/रवका/४९ दिनांक २८.११.१९७४.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.साप्रवि/रवका/२१७ दिनांक ७.४.१९९७.

----------

वरील संदर्भिय परिपत्रक क्र.४९ दि.२८.११.१९७४ अनुसार काही कर्मचारी त्यांचे वैयक्तिक कामासाठी राजकीय पक्ष, खासदार, आमदार यांचेमार्फत वरिष्ठ अधिका-यांवर दबाव आणतात, त्यांच्यावर शिस्तभंग कारवाई करणेबाबत निदेश दिले आहेत. तसेच, प्रशासकीय परिपत्रक क्र. २१७ दि.७.४.१९९७ अनुसार राजकीय दबाव आणणा-या कर्मचा-यांच्या सेवा पुस्तिकेत आणि गोपनीय अहवालात तशा नोंदी करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

२. वरील प्रमाणे सूचित करुनही काही कर्मचारी त्यांच्या वैयक्तिक कामासाठी उदाहरणार्थ पदोन्नती, बदली इत्यादीसाठी राजकीय पक्षांकडून अथवा लोकप्रतिनिधींकडून राजकीय दबाव आणण्याचे प्रयत्न करतात असे दिसून आले आहे.

३. सबब, म.रा.वी.वितरण कंपनीच्या सर्व कर्मचा-यांना पुन्हा एकदा असे निदेश देण्यात येत आहेत की त्यांनी वर नमूद केलेल्या परिपत्रकांमध्ये दिलेल्या सूचनांची दखल घ्यावी व त्यांच्या वैयक्तिक कामांच्या संबंधात वरिष्ठ अधिका-यांवर राजकीय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची गंभीर दखल घेऊन संबंधित कर्मचा-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल आणि असे प्रकरण त्यांच्या गोपनीय अहवालात अभिलेखित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

४. तसेच, सर्व सक्षम अधिका-यांना सुध्दा विनंती करण्यात येते की असे प्रकरण निदर्शनास आल्यास कर्मचा-यांचे विरुध्द शिस्तभंग कारवाई सुरु करावी, व अशा प्रकरणाची त्यांच्या गोपनीय अहवालात न चुकता नोंद घ्यावी. जेणे करुन सर्वसाधारण कर्मचा-यांमध्ये बळावत चाललेल्या अशा प्रकारच्या प्रवृत्तींना आळा बसेल.

५. सदर परिपत्रक व्यवस्थापकीय संचालक यांच्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

*( सु.य. पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति
प्रेषण यादी प्रमाणे उप विभागीय कार्यालयांचे स्तरापर्यंत

Circular 49-2